आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 20/09/2026 METRO CITY VRUTANT

> संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 200 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# वारसा, संस्कृतीकेंद्रित पर्यटनातून पुण्याचे ब्रँडिंग होणे आवश्यक

## पर्यटन संचालनालय पुणे विभागाचे उपसंचालक भारत लांघी यांचे प्रतिपादन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुण्याचे नाव पर्यटनाच्या जागतिक नकाशावर जाण्यासाठी समृद्ध वारसा आणि सांस्कृतिक वैभव, हे घटक सर्वाधिक महत्त्वाचे आहेत. पर्यटन धोरणाची प्रभावी अंमलबजावणी आणि पायाभूत सुविधांचा विकास वेगाने आणि गुणवत्तेने केल्यास, पुणे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर भारताचा पर्यटन ब्रँड ठरू शकते, असे प्रतिपादन पर्यटन संचालनालयाच्या पुणे प्रादेशिक विभागाचे उपसंचालक भारत लांघी यांनी शनिवारी येथे केले.**




पुणे फेस्टिव्हल आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित विशेष पर्यटन परिसंवादात ते बोलत होते. देवम टूर्स अँड ट्रॅव्हल्सचे अध्यक्ष नीलेश भन्साळी, पराशर अॅग्री अँड व्हिलेज टूरिझमचे संस्थापक संचालक मनोज हाडवळे आणि वेलनेस टूरिझमतज्ज्ञ डॉ.. संतोष सूर्यवंशी यांचाही परिसंवादात सहभाग होता. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल आणि जनरल सेक्रेटरी व सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई यांच्या हस्ते सर्व वक्त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मावळ तालुक्यातील दारुंब्रे गावातील आनंदमळा कृषी पर्यटन केंद्राचे समीर वाघोले यांना कृषी पर्यटन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

लांघी म्हणाले, 'केंद्र सरकारने 2020 मध्ये पर्यटन धोरण जाहीर केले असून, त्यातील धोरणांनुसार कार्यवाही सुरू आहे. आकडेवारीनुसार, दर दहा रोजगारांपैकी एक रोजगार हा पर्यटनाशी संबंधित असतो, हे स्पष्ट झाले आहे. त्यावरून पर्यटनामध्ये रोजगाराच्या केवढ्या क्षमता आहेत, याचीही कल्पना येईल. केंद्रीय पर्यटन धोरणाची अंमलबजावणी महाराष्ट्रात प्रभावीपणे सुरू आहे. पुणे हे शिक्षण, वाहन, आयटी, आरोग्य यांचे माहेरघर आहेच, पण पर्यटनाच्या दृष्टीने पुण्याचा प्राचीन, ऐतिहासिक वारसा आणि संपन्न संस्कृती, यांच्यावर लक्ष केंद्रित केल्यास पर्यटनाच्या जागतिक नकाशावर पुण्याचे नाव ठळक होत राहील. त्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास, दर्जेदार व सुरक्षित निवासव्यवस्था, सुरळीत वाहतूक आणि स्वच्छता सुविधांकडे जागरूकतेने पाहावे लागेल. पर्यटनस्थळ म्हणून पुणे आणि परिसरात कित्येक क्षमता आहेत. जुन्नर परिसर सातवाहनकालीन वारशासह बौद्ध लेण्यांचे केंद्र म्हणून विकसित करता येईल. याशिवाय साहसी पर्यटनाला मोठा वाव आहे. आरोग्य, क्रीडा, पुरातत्त्व, दुर्ग, लेणी, धरणे आणि कृषी, ग्राम पर्यटनाचे पर्यायही मोठ्या प्रमाणात वापरून पाहिले पाहिजेत. त्यासाठी सरकारी पातळीवर अनेक प्रोत्साहनपर योजना उपलब्ध आहेत. पर्यटन क्षेत्रात येऊ इच्छिणार्यांनी या योजनांची माहिती करून त्यांचा लाभ घेतला पाहिजे. महिलांसाठीही अनेक योजना आहेत. स्टार्टअप्ससाठी साह्ययोजना आहेत. युवकांनी तिकडे लक्ष दिले पाहिजे. आपल्या सोशल मिडिया व्यासपीठांवर पुणे परिसर, महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांचा जाणीवपूर्वक प्रचारप्रसार केला पाहिजे. अशा एकत्रित प्रयत्नांतूनच जागतिक पातळीवर आपले ब्रँडिंग शक्य होणार आहे.

नीलेश भन्साळी यांनी पर्यटन क्षेत्रात सरकारी आणि खासगी क्षेत्रांमध्ये समन्वय आवश्यक असल्याचे मत मांडले. सरकारची ध्येयधोरणे, तरतुदी, योजना आणि खासगी पर्यटन व्यावसायिकांची पूरक साथ, यातूनच पुणे आणि महाराष्ट्राचे पर्यटनाच्या दृष्टीने ब्रँडिंग शक्य होईल. पायाभूत सुविधा, वाहतूक, सुरक्षा हे मुद्दे सरकारी सहभागाशिवाय साकारणे अशक्य आहे, हे त्यांनी अधोरेखित केले.

सूर्यवंशी यांनी वेलनेस टूरिझमच्या अनेकानेक शक्यता सोदाहरण स्पष्ट केल्या. नैसर्गिक शेती, आयुर्वेदप्रणित जीवनशैली आणि गोशाळा, यातून स्वास्थ्य पर्यटन कसे विकसित करता येते, याचे विवेचन त्यांनी केले. अनेक देशांत कृषी व ग्रामीण पर्यटनाशी संबंधित विषयांचे पदवी अभ्यासक्रम चालविले जातात. आपल्याकडे मात्र तशी तरतूद नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

मनोज हाडवळे म्हणाले, विदेशी पर्यटक आकर्षित करण्यासाठी पायाभूत सुविधा, स्वच्छता, सुरक्षा आणि उत्तम भाषेत नेमकी माहिती देणारी व्यवस्था, यांची नितांत आवश्यकता आहे. जिथे या घटकांची पूर्तता दिसते, तिथे विदेशी पर्यटकांची संख्या वाढलेली दिसते, हा अनुभव लक्षात घेत तातडीने आपल्या पर्यटनस्थळांकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

करुणा पाटील यांनी मान्यवरांशी संवाद साधला व सूत्रसंचालन केले.

# 'फोटो साक्षरता वाढीस लागेल'-विक्रम पटवर्धन

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**एक वर्तुळ पूर्ण झाल्याची भावना आहे. अशा प्रदर्शनात माझेही फोटो असायचे. हे प्रदर्शन औचित्यपूर्ण आहे कारण दोनशे वर्षांपूर्वी 1826 मध्ये पहिला फोटो क्लिक झाला होता. अशा प्रदर्शनांच्या उपक्रमातून फोटो साक्षरता वाढीस लागेल अशी भावना ज्येष्ठ वृत्तपत्र छायाचित्रकार व वृत्तपत्र छायाचित्रकारांच्या जीवनावर आधारित प्रदर्शित झालेला 'फ्रेम' चित्रपटाचे दिग्दर्शक विक्रम पटवर्धन यांनी आज व्यक्त केली.**



पुणे फेस्टिव्हल आणि पुणे श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील वृत्तपत्र छायाचित्रकारांच्या फोटो प्रदर्शनाचे उद्घाटन बालगंधर्व कलादालन येथे त्यांच्या हस्ते झाले. त्या प्रसंगी ते बोलत होते. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश शेळके, सरचिटणीस हिरा सरवदे, पुणे फेस्टिव्हल सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, विश्वस्त मोहन टिल्लू, पुणे फेस्टिव्हल कलादालन समन्वयक सचिन आडेकर मंचावर उपस्थित होते. प्रारंभी दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरवात झाली. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल म्हणाले की, 'या प्रदर्शनात उत्तमोत्तम आणि निवडक छायाचित्रे आहेत. विषयांचेही वैविध्य आहे. पुढील वर्षीपासून हा उपक्रम अधिक मोठ्या प्रमाणात करू अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या सदस्य असणाऱ्या दैनिकांच्या छायाचित्रकारांनी गेल्या वर्षभरात काढलेल्या न्यूज फोटोंचे प्रदर्शन बालगंधर्व कलादालनात शनिवार दि. 19 सप्टेंबर व रविवार दि. 20 सप्टेंबर या दोन दिवशी सकाळी 10.00 ते रात्री 8.00 यावेळेत आयोजित करण्यात आले आहे. 12x 18 इंच आकाराच्या प्रिंट स्वरूपातील सुमारे 250 हून अधिक छायाचित्रे या प्रदर्शनात असतील. पत्रकार संघाचे सरचिटणीस हिरा सरवदे आणि राहुल देशमुख यांनी समन्वयक म्हणून काम पहिले. या फोटो प्रदर्शनातील पहिल्या तीन उत्तम छायाचित्रांना अनुक्रमे दहा हजार रुपये, सात हजार रुपये व पाच हजार रुपये आणि उत्तेजनार्थ एक अशी बक्षिसे पुणे फेस्टिव्हल तर्फे दिली जाणार आहेत. बालगंधर्व कलादालनचे पुणे फेस्टिव्हलचे समन्वयक सचिन आडेकर, आबा जगताप, अन्वर शेख हे उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवडमध्ये शालेय जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेला उत्साहात प्रारंभ

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**निगडी: पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व पुणे जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेला आज सेंट उर्सुला हायस्कूल, निगडी येथे उत्साहात प्रारंभ झाला. ही स्पर्धा दि. 19 ते 27 सप्टेंबर 2026 या कालावधीत होणार असून, 14, 17 व 19 वर्षांखालील मुले व मुली अशा विविध वयोगटांमध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.**



स्पर्धेचे उद्घाटन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर सौ. शर्मिलाताई बाबर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्रीडा समिती सभापती श्री. कैलास कुटे, प्रशासन अधिकारी (क्रीडा) श्री. दत्तात्रय सूर्यवंशी यांच्यासह क्रीडा विभागातील अधिकारी, कर्मचारी, प्रशिक्षक, खेळाडू व क्रीडाप्रेमी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा पर्यवेक्षक श्री. अरुण कडूस यांनी केले, तर सूत्रसंचालन श्रीमती सुनीता पालवे यांनी केले. उद्घाटनप्रसंगी श्री. राजेंद्र महाजन, श्री. सचिन ववले, श्री. निखिल सरीन, श्रीमती रोहिणी कदम, श्रीमती वर्षा थोरात तसेच त्यांचे सहकारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी सहभागी खेळाडूंना शुभेच्छा देत, शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे सांगितले. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संघभावना, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत होते.

**19 वर्षांखालील मुलांच्या सामन्यांचे निकाल**

1. सिम्बायोसिस ज्युनिअर कॉलेज विजयी विरुद्ध कमलनयन बजाज हायस्कूल – 14-08
2. इंदिरा स्कूल विजयी विरुद्ध जय हिंद हायस्कूल – 20-00
3. अक्षरा इंटरनॅशनल स्कूल विजयी विरुद्ध साधू वासवानी स्कूल – 18-06
4. कमलनयन बजाज हायस्कूल विजयी विरुद्ध ज्युनिअर कॉलेज – 14-08

**19 वर्षांखालील मुलांच्या पुढील सामन्यांचे निकाल**

1. सिटी प्राईड ज्युनिअर कॉलेज विजयी विरुद्ध इंदिरा नॅशनल स्कूल – 13-05
2. नोव्हेल ज्युनिअर कॉलेज विजयी विरुद्ध क्रीम सन अँड शॉप ग्लोबल स्कूल – 08-04
3. सेंट उर्सुला हायस्कूल विजयी विरुद्ध नोव्हेल ज्युनिअर कॉलेज – 26-00
4. एल प्रो स्कूल, चिंचवड विजयी विरुद्ध सिम्बायोसिस ज्युनिअर कॉलेज – 27-10

सदर जिल्हास्तरीय स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील विविध शाळा व महाविद्यालयांतील खेळाडू मोठ्या उत्साहाने सहभागी झाले असून, आगामी सामन्यांमध्येही चुरशीच्या लढती पाहायला मिळणार आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 20/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# उगवते तारे व इंद्रधनू कार्यक्रम

## १२०० बाल व युवा कलाकारांनीप्रेक्षकांना केले मंत्रमुग्ध!!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**38 व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये बालगंधर्व रंगमंदिर येथे संपन्न झालेल्या उगवते तारे व इंद्रधनू कार्यक्रमात पुणे व परीसरातील 60 शाळांमधील 1200 हून अधिक बाल व युवा कलाकारांनी सहभाग घेऊन प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.**



7 वर्षे ते 14 वर्षे वयोगटातील उगवत्या बाल कलाकारांसाठी 'उगवते तारे' आणि 15 ते 25 वर्षे वयोगटातील युवा कलाकारांसाठी 'इंद्रधनू' कार्यक्रमाचे आयोजन पुणे फेस्टिव्हलमध्ये केले गेले. दरवर्षीपेक्षा यंदा अधिक मोठा प्रतिसाद लाभला. बालगंधर्व रंगमंदिर येथे सकाळी 9.00 ते दुपारी 3.00 या वेळेत झालेल्या या कार्यक्रमास बाल व युवा कलाकारांसमवेत पालक, शिक्षक व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बाल व युवा कलाकारांनी अनेक प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. भारतनाट्यम ,कथक मोहिनीअट्टम या शास्त्रीय नृत्य प्रकारांबरोबरच लावणी-फ्युजन, संबळवादन , गुजराथी नृत्य,राजस्थानी नृत्य, आसामी नृत्य, फोल्क-डान्स, घुमर, देवीचा गोंधळ, देशभक्तीची गाणी, पोवाडा, जोगवा, सिने नृत्य, लोकनृत्य, आदिवासी नृत्य, गणेश वंदना, म्हैशासुर मर्दिनी स्तोत्र, मंगळागौरीचे खेळ असे विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम बाल व युवा कलाकारांनी सादर केले. या सर्वांनी आकर्षक वेशभूषा परिधान केली होती. यामध्ये अनेक समूह नृत्य वाहवा मिळवून गेली. टाळ्यांच्या कडकडाटात प्रेक्षक त्यांना प्रोत्साहन देत होते.

पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मुख्य संयोजक ॲड. अभय छाजेड, सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, माजी गृह राज्यमंत्री रमेश बागवे व विश्वस्त मोहन टिल्लू आदींनी आवर्जून येऊन बाल व युवा कलाकारांना शुभेच्छा दिल्या. सुप्रीया सेनगुप्ता यांनी सूत्रसंचालन केले. नीता राजपूत व ॲड.सचिन हिंगणेकर यांनी या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून काम पहिले. बालगंधर्व रंगमंदिराचे पुणे फेस्टिव्हलचे समन्वयक श्रीकांत कांबळे होते.

# विकासकामांसाठी छाटलेल्या झाडांचे लाकूड स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी मोफत उपलब्ध होणार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड:शहरातील विकासकामे, रस्ते रुंदीकरण आणि विविध कारणांमुळे मोठ्या प्रमाणावर झाडांची छाटणी केली जाते. या छाटल्या जाणाऱ्या झाडांचे लाकूड आता वाया न घालवता महापालिकेच्या वतीने शहरातील विविध स्मशानभूमींमध्ये अंत्यविधीसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी या महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णयाची माहिती दिली. याबाबत संबंधित विभागाला त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.**



शहरात विविध विकासकामांदरम्यान झाडांची छाटणी केली जाते. या छाटणीदरम्यान निघणारे लाकूड अनेकदा इकडे-तिकडे टाकून दिले जाते किंवा अयोग्य व्यवस्थापनामुळे ते वाया जाते. या समस्येचे गांभीर्य लक्षात घेत स्थायी समितीने या लाकडांचा योग्य वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. या नवीन धोरणांतर्गत, छाटणीतून मिळणारी ही सर्व लाकडे थेट शहरातील विविध स्मशानभूमींमध्ये पाठवली जातील.

या उपक्रमामुळे शहरातील नागरिकांना अंत्यसंस्कारासाठी लाकूड सहज उपलब्ध होणार आहे. शोकसागरात बुडालेल्या किंवा आपत्कालीन परिस्थितीत असणाऱ्या नागरिकांना बाजारातून वेगळी लाकडे विकत आणण्याची कोणतीही गरज भासणार नाही. एरवी कचऱ्यात किंवा अयोग्य ठिकाणी पडून नष्ट होणाऱ्या या लाकडांचा अत्यंत पवित्र आणि सामाजिक कामासाठी सदुपयोग केला जाणार असून, लवकरच महापालिकेच्या वतीने या उपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु होईल.

"शहरात विविध कारणांमुळे जी झाडे छाटली जातात, त्यातून निकोप आणि उत्तम दर्जाचे लाकूड उपलब्ध होते. हे लाकूड फेकून देऊन वाया घालवण्याऐवजी आम्ही धोरणात्मक निर्णय घेतला आहे. ही सर्व लाकडे स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी मोफत उपलब्ध करून दिली जावीत. यासाठी नागरिकांना वेगळी लाकडे आणण्यासाठी कोणतीही कसरत करावी लागणार नाही."

**अभिषेक बारणे**
(सभापती, स्थायी समिती, पिं.चिं.मनपा)

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

रविवार दिनांक 20/09/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपरी-चिंचवड महोत्सवातील लोकसंवाद उपक्रम

## 'लोकसंवाद' उपक्रमात विशेष कार्य अधिकारी किरण गायकवाड यांचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**शहराच्या सर्वांगीण विकासात नागरिकांचा सक्रिय सहभागही महत्त्वाचा आहे. महानगरपालिका, राज्य शासन आणि केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती घेऊन पात्र नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा तसेच शहराच्या विकास आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महानगरपालिकेचे विशेष कार्य अधिकारी किरण गायकवाड यांनी केले.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने 'पिंपरी-चिंचवड महोत्सव 2026' अंतर्गत प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित लोकसंवाद उपक्रमात ते बोलत होते. यावेळी महिला, युवक, युवती आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यावर भर

राज्य शासन तसेच महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांसाठी विविध योजना आणि उपक्रम राबविण्यात येत आहेत. समाज कल्याण विभागामार्फत महिलांसाठीच्या योजना, निराधार नागरिकांसाठीच्या योजना तसेच शैक्षणिक योजनांचा लाभ नागरिकांना मिळावा यासाठी योजनांचा प्रचार प्रसार करण्यात येत आहेत. राज्य शासनाच्या योजनांचा महानगरपालिकेच्या उपक्रमांमध्ये समावेश करून त्याचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या योजनांची माहिती व त्यांचे लाभही पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी यंत्रणा कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. शासनाच्या विविध विभागाच्या तसेच महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर विविध योजना आणि उपक्रमांची माहिती उपलब्ध आहे. नागरिकांनी संकेतस्थळाला भेट देऊन योजनांची माहिती घ्यावी तसेच पात्र लाभार्थ्यांपर्यंत ही माहिती पोहोचविण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

### सांस्कृतिक उपक्रमांमध्येही नागरिकांचा सहभाग आवश्यक

शहराचे वैभव केवळ भौतिक विकासातून नव्हे, तर सांस्कृतिक समृद्धीतूनही निर्माण होते. त्यामुळे नागरिकांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा. आगामी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातही नागरिक, कलाकार आणि चित्रपट निर्मात्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

### 'सारथी' ॲपवर समस्या नोंदविण्याचे आवाहन

नागरिकांच्या अडचणी आणि समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिकेचे 'सारथी' ॲप उपलब्ध आहे. नागरिकांनी आपल्या समस्या या ॲपवर नोंदवाव्यात, जेणेकरून त्यांची दखल घेऊन त्या सोडविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करता येईल, असेही आवाहन करण्यात आले.

यावेळी गझल गायक अशोक गायकवाड यांनी नागरिकांना लोकसंवाद उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. माहिती अधिकारी गणेश फुंदे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी लोकसंवाद उपक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे संयोजन उपसंपादक संदीप राठोड, जितेंद्र खंडागळे आणि विशाल तामसीकर यांनी केले.कार्यक्रमास महिला, युवक, युवती तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे फेस्टिव्हलमध्येमुलींच्या मल्लखांब स्पर्धा संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**38 व्या पुणे फेस्टिव्हल अंतर्गत टिळक रोड वरील महाराष्ट्र मंडळ येथे आज मुलींच्या दोरीवरील मल्लखांब स्पर्धा पार पडल्या. चितळे बंधू मिठाईवाले उद्योग समूहाचे श्रीकृष्ण चितळे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.**




पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, क्रीडा समिती प्रमुख प्रसन्न गोखले या प्रसंगी उपस्थित होते. या स्पर्धेत 16 वर्षांखालील वायोगटातील 150 हून अधिक मुली सहभागी झाल्या होत्या.

या प्रसंगी द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित योगेश मालवीय आणि महाराष्ट्र हौशी मल्लखांब संघटना कार्यकारिणी सदस्य ॲड. संजय केकाण यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

रमा गोखले यांनी पुरलेल्या खांबावरील मल्लखांबाचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

मुलांची मल्लखांब स्पर्धा रविवारी दि. 20 सप्टेंबर रोजी संपूर्ण दिवसभर होणार आहे. पुणे जिल्हा मल्लखांब असोसिएशनच्या सहकार्याने स्पर्धा घेण्यात आल्या.

प्रारंभी महाराष्ट्र मंडळाचे रोहन दामले यांनी स्वागत केले आणि आभार अभिजित भोसले यांनी मानले.

स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा रविवार दि. 20 सप्टेंबर रोजी सायंकाळी 4.30 वाजता महाराष्ट्र मंडळ येथे संपन्न होईल.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968